MS-CIT
World-class Comprehensive Computer Course

**Model Answer**
**Set- III**
**Std. – 10th EM**
**Subject – Marathi L.L.**

MKCL KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers

**Time : 3 Hrs.** **Marks : 80**

## विभाग १ : पठित गदय

**प्र.१ अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) **उताऱ्यातील पुढील संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करा:**

i) वजन कमी करण्यासाठी पंतांना जे उपद्व्याप करावे लागले, त्यामुळे जेरीस येऊन त्यांनी हे सत्य आकळणारे उद्गार काढले आहेत. काट्यांतून चालावे तसा हा वजन कमी करण्याचा मार्ग आहे, असा या वाक्याचा अर्थ आहे.

ii) सगळ्यांच्या सल्ल्यांनुसार वागणे, वजन कमी करण्यासाठी पराकाष्ठा करणे भलते उपाय करणे याला मनाचा असामान्य निग्रह म्हणजे निर्धार असे म्हटले आहे.

२) आकृती पूर्ण करा:

पंतांच्या उग्र साधनेचे →
- महिन्याचा उपास
- निराहार
- शास्त्रोक्त आहार
- दोरीवरच्या उडया

३) जेव्हा पंतांनी वजन घटवण्याचा शेवटचा निकराचा प्रयत्न केला; त्या वेळी त्यांनी केलेल्या कृती फारच विनोदी आहेत. त्यांना सडपातळ झाल्याची स्वप्ने पडू लागली. जेवणाचे ताट पुढे असताना न खाता ते उठू लागले. साखर पाहिली की त्यांना अतोनात राग येऊ लागला. लिंबाचा रस म्हणजे त्यांना अमृत वाटू लागले. धारोष्ण दुधासाठी ते अंधेरीच्या गोठ्यात जाऊ लागले. नि सर्वांत कहर म्हणजे बिनसाखरेचा आणि बिनदुधाचाच नव्हे; तर बिनचहाचा ते चहा पिऊ लागले. ही पंतांची झालेली परिस्थिती पाहून मला खूप हसू आले.

**आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१)

भावे सरांच्या प्रयोगातून लेखक या गोष्टी शिकला. →
- एकाग्रतेचा मंत्र
- विज्ञान

२) **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

i) भावे सर भौतिकशास्त्र विषय शिकवत.

ii) लेखकाने आई, शिक्षक व शाळा यांना 'संस्कार केंद्र' असे म्हटले आहे.

३) भावे सरांबद्दल लेखकाला प्रचंड आदर व श्रद्धा होती. ते भौतिकशास्त्र शिकवत विज्ञानातील हा विषय शिकविताना त्यांनी केवळ शास्त्र शिकवलं नाही तर त्या विषयाची गोडी लावली आणि त्याचबरोबर जीवनाचं फार मोठं तत्वज्ञान शिकवलं. एके दिवशी त्यांनी एक प्रयोग करून दाखवला भिंगाच्या साहाय्याने सूर्यकिरणांची शक्ती कागदावर एकत्र केल्यास कागद जळतो. हे दाखवून ते म्हणाले "माशेलकर, तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा. काहीही जाळता येईल." एकीकडे मला एकाग्रतेचा मंत्र दिला दुसरीकडे विज्ञान

समजले. त्यामुळे भावेसरांचे शब्द हीच खरी उर्जा आहे.

**(इ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) **भाषाविकासाचा ओघतक्ता तयार करा.**

भाषाविकासाचे टप्पे :- श्रवण→ भाषण→ वाचन→ लेखन

(२) **आकृतिबंध पूर्ण करा.**

**चांगल्या लेखनाची वैशिष्ट्ये:**

i) उत्तम हस्ताक्षर ii) दोन शब्दांत योग्य अंतर iii) शुद्धलेखन iv) विरामचिन्हे, अर्थदर्शक चिन्हे यांचा योग्य वापर

**विभाग – २ : पदय**

प्र.२ **कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

i) योगी पुरूषाचा गोडपणा हे सर्व इंद्रियांना शांत करणारा असतो.

ii) योगी पुरूष आपल्या श्रवण कीर्तनाने सर्वाचा उद्धार करतो.

iii) योगी पुरूष अंतर्बाह्य स्वच्छता करतो.

iv) योगी पुरूष स्वानंद तृप्ती देतो.

२) **तुलना करा :**

| **योगी पुरूष** | **पाणी** |
|---|---|
| i) योगी पुरूष अंर्तबाह्य स्वच्छता करतो. | i) पाणी वरवरचा मळ काढून टाकते. |
| ii) योगी सदा सर्वकाळ स्वानंदतृप्ती देतो. | ii) पाणी क्षणभर तहान भागवते. |
| iii) योगी पुरूषाचे गोडपणा सर्व इंद्रियांना तृप्त करते, समाधान देते. | iii) पाण्याचा गोडवा फक्त जीभ या इंद्रियापुरता मर्यादित असतो. |
| iv) योगी आपल्या श्रवण कीर्तनाने सर्वांना उद्धार करतो. | iv) पाण्यामुळे शेते पिकताना व सर्वांना अन्न मिळते. |

३) **प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.**

i) उदक – पाणी ii) पांखोवा – पक्षिणीचे पंख iii) निर्मळ – स्वच्छ iv) मधुरता – गोडवा

४) संत एकनाथ महाराजांनी योगी पुरूष व पाणी यांच्या प्रस्तुत अभंगात तुलना केली आहे.

योगी पुरूष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे हे सांगताना ते म्हणतात पाणी हे वरवरचा मळ धुवून टाकते. पंरतु योगी सर्व जनांचे मन अंतर्बाह्य निर्मळ करून सोडतो. पाण्याने एकावेळची तहान भागते. परंतु योगीपुरूष हा सर्वांसाठी पूर्ण वेळ सुख देणारा असतो. तहानलेला माणूस पाणी प्यायल्यावर फक्त त्या त्या क्षणी तृप्त होतो पण योगी न संपणारे अखंड आत्मसुख देतो. पाण्याची गोडी फक्त जिभेला तृप्त करते. परंतु योगीपुरूषाने दिलेला गोडवा सर्व इंद्रियांना शांत करतो. ढगातून जमिनीवर पडलेल्या पाण्यातून अन्नधान्य निर्माण होते. त्यातून लोकांची भूक भागते. त्याचप्रमाणे योगीपुरूष जेव्हा मृत्यूलोकात जन्म घेतो. तेव्हा त्याचे बोल ऐकण्याने आत्मज्ञानाने माणसांची मने नि:स्वार्थी व निर्मळ होतात. अशाप्रकारे संत एकनाथांनी अनेक उदाहरणातून स्पष्ट केले आहे.

प्र.२ **(आ)** ‘औक्षण’ व ‘स्वप्न करू साकार’ या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.

(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री- इंदिरा संत.

(२) कवितेचा विषय-    देशाचे प्राणपणाने रक्षण करणाऱ्या सीमेवरील जवानाविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी ही कविता आहे.

(३) सैनिक आपल्या देशाच्या सीमेवर अहोरात्र पहारा देतात. कधी काळी परचक्राचे आक्रमण झालेच, तर ते धैर्याने शत्रूशी मुकाबला करतात. ते चिरंजीवी व्हावे, म्हणून जनता आसवांच्या ज्योतींनी त्यांना औक्षण करते. जवानांच्या शौर्यगाथेपुढे नतमस्तक होण्याची शिकवण ही कविता सहजपणे देते.

(४) देशाच्या सीमेवर जागरूकपणे पहारा देणाऱ्या व प्रसंगी जीवाची बाजी देणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी ही कविता आहे. सैनिक देशाची राखण करतो. अशा सैनिकाला जनता काय उपहार देऊ शकते? ती फक्त त्याचे भले चिंतून त्याचे औक्षण करू शकते. त्याला चिरंजीवित्वाचा आशीर्वाद देऊ शकते. हा विचार माझ्या मनाला भिडला आणि म्हणून मला ही कविता आवडली.

(५) औक्षण – अ) शौर्य – पराक्रम    ब) बंबारा  - तोफगोळ्यांचा भडीमार    क) सामर्थ्य – बळ
ड) औक्षण – ओवाळणे.

**अथवा**

स्वप्न करू साकार -  अ) चैतन्य – आनंद      ब) आभाळ – आकाश      क) तेज – प्रकाश
ड) शुभंकर – शुभ करणारा

**विभाग – ३ स्थूलवाचन**

**प्र.३    पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

**१)    व्युत्पत्ती कोशाचे कर्य : -**

व्युत्पत्ती म्हणजे एखादया शब्दाच्या किंवा अर्थाच्या मुळाचे ज्ञान होय. व्युत्पत्ती सांगणे म्हणजे एखादया शब्दाच्या मुळाविषयी माहिती देणे होय. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश ! व्युत्पत्ती कोशाचे कार्य पुढील प्रमाणे चार प्रकारे चालते:

१) मराठी भाषेतील – प्रमाण व बोली – शब्दांचे मूळ रूप दाखवणे.

२) विशिष्ट प्रदेशात व भौगोलिक परिसरात एकाच शब्दातील उच्चारात बदल होत असतो. हा शब्दाच्या उच्चारातील बदल व फरक दाखवणे.

३) भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने फरक होत असतात. भिन्न भिन्न काळात हे शबदांत बदल होतात, त्या बदलांचे कारण स्पष्ट करणे.

४) भिन्न भिन्न समाजात वेगवेगळ्या कारणांनी शब्दाच्या अर्थाच्या अंगानेही बदल संभवतात.हे अर्थातील बदल स्पष्ट करणे.

**२)**    दिवाळीत रंगीत कागदी कंदिलाची शोभा मला खूप आवडते. आई नेहमी बाजारातून छोटे कंदील विकत आणायची. या वर्षी मी ठरवले की आपण स्वत: कागदी कंदील तयार करायचा. बघू या जमते की नाही ते? मी स्वत: स्टेशनरीच्या दुकानातून रंगीत झिलेटीन, कागद व काड्या आणल्या. सुताचे बंडल आणले. नि दिवाळीच्या आदल्या सकाळी कंदील करायला घेतले. चौकोनात काड्या जोडायला घेतल्या. पण काहिई मनासारखे जमेना. दुपार झाली मी पुन्हा विस्कटायचो पुन्हा जोडायचो. नीट जमत नव्हते. पण निर्धार केला की कंदील पूर्ण झाल्या शिवाय जेवायचे नाही. हळूहळू मला ते जमायला लागले. पूर्ण कंदीलाचा काड्यांचा स्संगाडा तयार झाला. मग त्यावर ताणून वेगवेगळे रंगीत कागद चिटकवणे सोपे गेले. अखेर खूप मेहनतीनंतर सुंदर कंदील तयार झाला. तेव्हा मला कळाले की, ‘प्रत्यक्षानुभवातून शिकणे हे अधिक परिणामकारक असते.

**३) टिपा लिहा.**

(i) सग्वारो कॅक्टसचे दिसणे –

कॅक्टस हा वाळवंटी प्रदेशाचा अगदी खास प्रतिनिधी आहे. कॅक्टसच्या अनेक जाती आहेत. सग्वारो कॅक्टस हा कॅक्टसचा राजा. तो ५० फूट उंचीपर्यंत वाढतो. म्हणजे कॅक्टस राक्षसासारखाच असतो. त्याची वाढ इतकी मंद असते, की ५० वर्षात तो फक्त ३ फूट वाढतो आणि २०० वर्ष जगतो म्हणजे आज उभे असलेले काही सग्वारो कॅक्टस दुसरे बाजीराव पेशवे यांच्या काळापासूनचे आहेत. तसेच सग्वारोची पन्नास वर्षात तीन फूट वाढ होते या हिशोबाने एक माणूस त्याच्या सबंध आयुष्यात सग्वारो कॅक्टस फार फार तर त्याच्या कमरेच्या थोडासा वरपर्यंत वाढलेला पाहील.

(ii) सग्वारो कॅक्टसचे उपयोग –

अमेरिकेतले रेड इंडियन लोक पूर्वीच्या काळी सग्वारो कॅक्टसचा अनेक प्रकारे उपयोग करून घेत असत. अवर्षणाच्या काळात कॅक्टस चेचून ते त्याचे पाणी काढत आणि तहान शमवण्यासाठी ते पाणी पीत. सग्वोरा कॅक्टसला फळे येतात, त्यामधला गर कलिंगडाच्या गरासारखा असतो. रेड इंडियन लोक ही फळे चवीने खात असत. फळाच्या गरात साखर घालून तो मोरावळ्यासारखा टिकवता येतो.

**प्र.४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**१) पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा.**

i) शेण, गोठा, वगैरे जी पडतील ती सारी कामं कर. – आज्ञार्थी वाक्य.

ii) तू चित्र काढले आहे. – विधानार्थी वाक्य.

**२)** कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य रूपांतर करा.

i) मी परिक्षेत अनुत्तीर्ण होणार नाही.

ii) आम्ही तुमचे उपकार कसे विसरणार नाही.

**३)** खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन )

i) हकालपट्टी करणे. – हाकलून लावणे – वाक्य – भारतातून इग्रजांची हकालपट्टी करण्यात आली.

ii) तिळपापड होणे – खूप राग येणे – साखर पाहिली की माझ्या अंगाचा तिळपापड होऊ लागला.

iii) संघर्ष करणे – लढा देणे – दहशवादा विरूद्ध भारताचा संघर्ष सुरू आहे.

प्र.४ **आ) भाषासौंदर्य**

१) **शब्दसंपत्ती**

**i) शब्दांचे समानअर्थी शब्द लिहा.**

अ) उदयान – बाग / बगीचा   ब) कन्या – मुलगी

**ii) खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.**

अ. आशीर्वाद × शाप   ब. कृतज्ञ × कृतघ्न

**iii) खालील शब्दांचे लिंग बदला.**

अ. माकड - माकडीण   ब. बोकड – बकरी

**iv) खलील शब्दांचे वचन बदला.**

अ) राजा - राजे   ब) पोलीस - पोलीस

२) **लेखाननियमांनुसार लेखन**

अ) आज हळदी-कुंकवाचा कार्यक्रम आहे.

ब) निरंजनची गुरूजींवर अपार श्रद्धा होती.

३) **खालील वाक्यांत विरामचिन्हे वापरुन वाक्य पुन्हा लिहा.**

i) मला पुस्तक आणून देतेस का?

ii) आई म्हणाली, “पोटभर खाऊन घे.”

प्र.५ **अ) खालील कृती सोडवा.**

**१) पत्रलेखन**

दि. १० फेब्रूवारी, २०२२

प्रति,

माननीय संचालक,

हिरवाई ट्रस्ट,

बालोदयान मार्ग,

तळेगाव दाभाडे.

विषय : वृक्षारोपणासाठी रोपांची मागणी करण्याबाबत.

महोदय,

जागतिक पर्यावरण दिन आमच्या शाळेत साजरा केला जाणार आहे. ५ जून या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शाळांसाठी रोपांचे मोफत वाटप आपल्या ट्रस्टकडून केले जात असल्याचे संस्थेच्या जाहिरातीत वाचले. वृक्षारोपणासाठी आमच्या शाळेलाही काही रोपे हवी आहेत.

रोपे घेण्यासाठी शाळा प्रतिनिधींना तेथे यावे लागेल की, आपण आपल्या संस्थेमार्फत रोपे शाळेच्या पत्त्यावर पाठवू शकाल, याबाबत कळवल्यास बरे होईल.

रोपांच्या नावांची यादी सोबत जोडत आहे :

| अनु.क्र | रोपांचे प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १) | विविध फुलझाडे | ५० |
| २) | विविध औषधी रोपे | २५ |
| ३) | अशोक | ५० |
| ४) | निलगिरी | ५० |

आपला कृपाभिलाषी,

अ.ब.क.

विदयार्थी प्रतिनिधी,

ज्ञानदीप विदयालय,

तळेगांव दाभाडॆ, पुणे - ४१११०८४

aba@gmail.com

**२) पुढील उतारा वाचा व त्याचा १/३ एवढा सारांश लिहा.**

भाषा ही मानवाला मिळालेली सर्वोत्तम देणगी व संवादाचे एक प्रभावी माध्यम आहे. जन्माला आल्यापासून जवळ कानांवर पडणारी भाषा आपण आत्मसात करतो मग बोलू लागतो. आज्जीच्या गोष्टी, गाणी ऐकून बोलू लागतो. मग वाचनाचा टप्पा शाळेत सुरू होतो. पहिले एक अक्षर मग शब्द मग वाक्य करत करत आपल्याला वाचनाची आवड निर्माण होते आणि मग लेखनाचा टप्पा पार होतो. वाचन चांगले तर लेखन उत्तम व उत्तम लेखन तर चांगले वाचन. यासाठी उत्तम हस्ताक्षर, शुद्ध लेखन, शब्दांत योग्य अंतर आणि विरामचिन्हे यांचा वापर करुन लेखन अर्थपूर्ण व दर्जेदार असावे.

**प्र.५ आ) पुढील कृती सोडवा.**

१) **खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा.**

**थंड थंड ...... गार गार.......**

## गुड्डीज आईस्क्रीम पार्लर

आमाच्याकडे सर्व प्रकारची व सर्व चवींची
आईस्क्रीम माफक दरात मिळतात.



**मँगो, सीताफळ,**

**बटरस्कॉच, व्हॅनिला,**

**ब्लॅकबेरी, टुटीफुटी**

||**ग्राहकांचे समाधान हेच आमचे ध्येय** ||

२) **रेल्वे तिकिटासोबत आता स्वओळखपत्राचीही होणार तपासणी**

१६ एप्रिल : भारतातील पहिली रेल्वे धावली या घटनेला काल एकशे पासष्ठ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने नागरिकांच्या सोयी- सुविधांमध्ये वाढ करण्यासाथी रेल्वे प्रशासनाकडून काही उपक्रम जाहिर करण्यात आले.तसेच काही महत्त्वाच्या सूचनाही करण्यात आल्या. यामधील लक्षवेधी म्हणजे रेल्वे प्रवासात आता स्वओळखपत्रही अनिवार्य असणार आहे. रेल्वे प्रवासातील सुरक्षा वाढावी हा यामगचा उद्देश असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. स्वओळखपत्रामध्ये आधारकार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स,इलेक्शन कार्ड यांपैकी कोणतेही एक असणे आवश्यक असल्याचे रेल्वे प्रशासनाने आमच्या प्रतिनिधींशी साधलेल्या संवादातात सांगितले आहे. नागरिकांनीही या सूचनेला हिरवा सिग्नल दिला असून लवकरच याची अंमलबजावनी केली जाणार असल्याचे प्रशानाकडून सांगितले आहे.

३) **कथालेखन.**

**खाली एका कथेची सुरवात दिली आहे. त्यावरून कथा पूर्ण करा.**

एका घनदाट जंगल होते. या जंगलातून राम आणि श्याम प्रवास करत होते. दोघे मित्र गप्पा मारत, गाणी म्हणत पुढे जात होते. अचानक समोरील मोठ्या झुडपातून एक मोठे अस्वल बाहेर आले व त्यांच्या अंगावर धावून आले. दोघांनी कोणतेही संकट आल्यास एकमेकांना मदर करायची, असे ठरवले होते; पण राम हे विसरला. राम सडपातळ असल्याने त्याला पटकन झाडावर चढणे शक्य झाले. लठ्ठ श्यामला मात्र झाडावर चढता येत नव्हते. अस्वल तर जवळ येऊ लागले होते.

श्याम ने देवाचा धावा केला. त्याला एक युक्ती सुचली. श्याम मेल्याचे सोंग घेऊन निपचित पडून राहिला. अस्वल त्याच्याजवळ आले. त्याने श्यामचे नाक हुंगून पाहिले. तो मेला आहे, अशा समजुतीने ते तिथून निघून गेले. अस्वल दूरवर निघून गेल्यावर राम खाली उतरला. खरे म्हणजे रामला वाटले होते, की अस्वल आता नक्कीच श्यामवर हल्ला करणार . तो उंच झाडावर बसून सर्व पाहत होता, जेव्हा अस्वल श्यामच्या अगदी जवळ गेले, तेव्हा तर पुढील कल्पनेने राम झाडावर भीतीने घामाघूम झाला होता. अस्वल काही न करता निघून गेल्यावर रामच्या आश्चर्याला पारावार उरला नाही.

प्रसंगावधान राखून मेल्याचे सोंग करण्याची श्यामची युक्ती यशस्वी झाली होती. रामच्या मात्र हे लक्षात आले नाही. झाडावरून खाली उतरल्याबरोबर रामने श्यामला विचारले. “दोस्ता, अस्वलाने तुझ्या कानात काय सांगितले बरे!”

चतुर श्यामने पटकन उत्तर दिले, “अरे, अस्वलाने मला खूप मोलाचा सल्ला दिला, की विश्वासघातकी मित्राशी कधीही मैत्री करू नकोस.” जे ऐकून राम खजील झाला. त्याने श्यामची माफी मागितली. श्यामनेही मोठ्या मनाने त्याला माफ केले.

इ) **(इ) लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** (**शब्दमर्यादा १०० ते १२० शब्द**)

२) सकाळी गजर वाजला उठून बघितलं, घड्याळात ७ वाजले होते. तो गजर बंद करून परत झोपलो. अचानक आवाज आला, 'अरे उठ किती झोपतोस!' मी घाबरलो. घरात कुणीच नसताना कोण बोललं ?

'अरे मी बोलतोय मी, तुझे घड्याळ. आज तुझ्याशी बोलावसं वाटलं. तुझ्या वडिलांनी मला एका इलेक्ट्रॉनिक्स च्या दुकानात खरेदी केलेले. तेंव्हापासून आजपर्यंत तुमच्या घराची सेवाच करत आलेलो आहे. ९ वर्ष उलटली तुझ्या वडिलांचं निधन झालं आईला तू घरातून हाकलून दिल. या सर्व गोष्टीला मी अभागीपणे साक्ष देत होतो. त्या ममतेचे अश्रू अजून माझ्या डोळ्यात भरून आहे.'

'तू माझा नियमित वापर करतो. येताजाताना वेळ बघण्यासाठी उपयोग करतो. ऑफिसला जाण्यासाठी अलार्म सेट करतो. तुझ्या आनंदातच माझा आनंद. परंतु आता मी जुना झालोय. कधी बॅटरी संपते तर कधी माझे तीन काटे एकमेकांत अडकतात. परंतु एका चांगल्या गुरुसारखा तू माझा त्याग केला नाहीस अजून.'

'परंतु एक दिवस असा येईल जेव्हा मला बदलणं तुझी गरज होईल. तो क्षण दोघांसाठीही दुखदायी असेल. चल जा तू ऑफिसला मीही माझं काम करतो. बाय बाय...' आणि मग तो आवाज पुन्हा नाहीसा झाला.